MHWS080018552023

**<u>रे. मु. नं. १२२/२०२३ मधील नि.क्र. १९ वरील आदेश</u>**

प्रतिवादी क्र.०४ यांनी प्रस्तूतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला जबाब चौकशीचा आदेश रदद होउन त्यांचा लेखी जवाब दाखल करण्यास झालेला विलंब माफ होउन लेखी जबाब दाखल करणेस परवानगी मिळणेबाबत दिलेला आहे.

**०२.** अर्जातील प्रतिवादी क्र.०४ यांचे कथनानुसार, वादींनी मागील तारखेस प्रतिवादी क्र.०४ यांना दावा तसेच कागदपत्रांच्या प्रती न पुरवल्यामुळे प्रतिवादी यांना वेळेत आपला लेखी जबाब दाखल करता आला नाही. प्रतिवादी यांनी जाणुन बुजून विलंब केला नसल्याने त्यांचे विरुध्द झालेला विनाजबाब चौकशीचा आदेश रदद झालेला विलंब माफ व्हावा अशी विनंती करुन सोबत दिलेला लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी मिळावी असे नमूद केले आहे.

**०३.** सदर अर्जावर वादीचे लेखी म्हणणे मागविण्यात आले असता वादीने अर्जास सक्त विरोध दर्शवून प्रतिवादी क्र.०४ ला नि.क्र.१४ वर दिनांक ३१.०१.२०२४ रोजी दावा समन्सची बजावणी झाली असून सुमारे चार ते पाच महिन्याचे विलंबाने लेखी जवाब दाखल करीत आहेत. प्रतिवादींना हे प्रकरण प्रलंबित ठेवण्याच्या उददेशाने विलंब केला असल्याने अर्ज २०००/— रुपये खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०४.** अर्ज वाचला. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण दाव्याचे अवलोकन केले असता वादीने प्रस्तूतचा दावा वाटप, स्वतंत्र ताबा, जाहीर ठराव व निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी क्र.०४ यांना नि.क्र.१४ प्रमाणे दिनांक ३१.०१.२०२४ रोजी दावा समन्सची बजावणी झाली असून दिनांक ०३.०४.२०२४ रोजी वकीलांमार्फत हजर झालेली आहे. त्यानंतर सदरचा अर्ज दिनांक १५.०६.२०२४ म्हणजेच सुमारे चार महिन्यापेक्षा जास्त विलंबाने दाखल केलेला दिसून येते. अर्जदार विलंबाबाबत नमूद केलेले कारण कागदोपत्री पुराव्याअभावी संयुक्तीक वाटत नाही. परंतु प्रतिवादी क्र.०४ यांचा अर्ज नामंजूर केल्यास त्यांना स्वत:चा बचाव मांडण्याची संधी नाकारल्यासारखे होईल. याउलट अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचा बचाव न्यायालयासमोर येउन दावा गुणदोषांवर चालवण्यास व निकाली करणेस मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीला लेखी जबाब दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत ठराविक

दंड आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित असल्याचे निष्कर्षाप्रत येवून खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येतो.

**—: <u>आदेश</u> :—**

१ प्रतिवादी क्र.०४ यांचा प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. १९ मंजूर करण्यात येतो.

२ प्रतिवादी क्र. ०४ यांना कैफियत/लेखी जबाब दाखल करण्यास झालेला विलंब त्यांनी रक्कम रू. ३००/— चा दंड वादींना देण्याच्या अटीवर माफ करणेत येतो. प्रतिवादी यांनी दिलेली कैफियत/लेखी जबाब, आदेशित दंडाची रक्कम जमा केल्यानंतर दाव्याच्या कामी दाखल करण्यात यावी.

स्वा/—

(पी. व्ही. सपकाळ)

दिनांक — ०६.०७.२०२४ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, रिसोड

**<u>शेरा</u>**

मी शपथेवर सांगतो की, आदेशातील मूळ मजकूर व पी.डी.एफ. मधील मजकूर शब्द—न—शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | : | पी.व्ही.सपकाळ<br>दिवाणी न्यायाधीश व प्रथमवर्ग<br>न्यायदंडाधिकारी, रिसोड |
| लघुलेखकाचे नांव | : | एच.ए. उचाडे |
| निकाल तारीख | : | ०६.०७.२०२४ |
| पिठासीन अधिका—याने आदेशपत्रावर सही केलेचा दिनांक | : | ०६.०७.२०२४ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | : | |